# शिक्षकांनी दीपस्तंभासारखे तत्त्वज्ञान अंगीकारून ज्ञानदान करावे : डॉ. जोशी

**कोल्हापूर :** शिक्षकांनी दीपस्तंभासारखे तत्त्वज्ञान अंगीकारून ज्ञानदानाचे कार्य करावे, असे आवाहन प्रभारी प्राचार्या डॉ. श्रुती जोशी यांनी केले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेज येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व व्यावसायिक नैतिकता' या विषयावर एकदिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. दुसऱ्या सत्रात डॉ. जी. जे. नवाथे, डॉ. डी. आर. तुपे व प्रा. एच. व्ही. चामे यांनी परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता व मूल्यमापनातील जबाबदाऱ्यांवर मार्गदर्शन केले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
• कोल्हापूर मंगळवार, दि. २१ जुलै २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये प्राध्यापक विकास कार्यक्रमाला प्रतिसाद

**• शिक्षकांनी दीपस्तंभासारखे तत्वज्ञान अंगीकारुन ज्ञानदानाचे काम करावे : डॉ. श्रुती जोशी**

**जनप्रवास : कोल्हापूर**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्यावतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि व्यावसायिक नैतिकता या विषयावर एकदिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रम उत्साहात झाला. या कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने आणि रोपाला पाणी घालून करण्यात आली.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले. ते म्हणाले की, या कार्यक्रमामुळे नवनिर्वाचित प्राध्यापकांना ऊर्जा निर्माण होईल. तसेच त्यांच्या भावी शैक्षणिक वाटचालीस हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरेल. हा कार्यक्रम तीन सत्रात झाला.

पहिल्या सत्रात प्र. प्राचार्या डॉ. श्रुती जोशी (कन्या महाविद्यालय, इचलकरंजी) यांनी शैक्षणिक संस्थांमधील नैतिक मूल्यांचे महत्त्व आणि शिक्षकांची जबाबदारी या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात संस्था उभारणीसाठी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी केलेला त्याग सर्वांसमोर मांडला. त्या म्हणाल्या, बापूजींनी विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून या संस्थेची उभारणी केली आहे. हा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्राध्यापकांनी आपले शैक्षणिक कार्य केले पाहिजे. शिक्षकांनी सामाजिक आणि व्यक्तिगत जीवनात नैतिकता सांभाळल्या पाहिजेत.

दुसऱ्या सत्रात परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता या विषयावर डॉ. जी. जे. नवाथे (परीक्षा नियंत्रक), डॉ. डी. आर. तुपे (उपपरीक्षा नियंत्रक), प्रा. एच. व्ही. चामे यांनी परीक्षा प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी घ्यावी लागणारी काळजी तसेच विद्यार्थ्यांना परीक्षेविषयी द्यावयाच्या सूचना आणि मूल्यमापन करताना प्राध्यापकांच्या जबाबदाऱ्या याविषयी मार्गदर्शन केले. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षचे समन्वयक डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सुप्रिया पाटील यांनी केले. आभार कविता तिवडे यांनी मानले.